महाराष्ट्र शासन

क्रमांक: व्हीएलएस १००४/(१(८)/२००४)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०९ फेब्रुवारी, २००४.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
नासिक /पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

**विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षा परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३४ ( चौतीस ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००३ पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. तसेच सोबतच्या यादीतील संस्थेस त्याच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी जर यापूर्वी नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी दिली

C:\ARUN\ENGLISH PERE\[illegible] I(T) 04 09 02 04 FORWARDING

PRINCIPAL
MOTHER TERESA SCHOOL
GALANDE NAGAR,
VADGAONSHERI, PUNE-14

1

असेल तर प्रथम मान्यता देण्यापूर्वी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

( सु.ह. टमराणीकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,.ठाणे/पुणे/जळगांव/कोल्हापूर/रत्नागिरी/औरंगाबाद/अमरावती/गोंदिया.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जिल्हा - पुणे. | | |
| १६ | जनहित प्रतिष्ठाण, १/२४४, कानिटकर वाडा, कसबा, बारामती,ता.बारामती | बारामती, पुणे. | इंग्रजी | १ ली |
| १७ | तिरुपती शिक्षण प्रतिष्ठान संचलित, धनकवडी, पुणे. | धनकवडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १८ | जयजवान एज्युकेशन सोसायटी, अमोल पॅलेस, मतेनगर, वडगावशेरी, पुणे. | वडगावशेरी, पुणे-१४. | इंग्रजी | १ ली |

TRUE COPY

JAIJAWAN EDUCATION SOCIETY
MOTHER THERESA SCHOOL
VADGAON SHERI, PUNE-14.

PRINCIPAL
MOTHER TERESA SCHOOL
GALANDE NAGAR,
VADGAONSHERI, PUNE-14